## प्रकरण ९ सामाजिक आरोग्य

## (१ गुणांचे प्रश्न )

**प्रश्न १ . दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्यायाचे वर्णाक्षरे लिहा .**

१. हास्यमंडळ हा ................दूर करण्याचा एक उपाय आहे.

अ ) ताणतणाव

ब ) व्यसने

क ) आळस

ड ) रोगराई

२. मद्यसेवनाने मुख्यत: ...............संस्थेला धोका असतो.

अ ) पचन

ब ) श्वसन

क) चेता

ड ) उत्सर्जन

३ . IT ACT 2000 हा कायदा ............ गुन्ह्यांना आळा घालण्यआत आला आहे.

अ ) घरफोडीच्या

ब ) सायबर

क ) फसवणुकीच्या

ड) खिसेकापूंच्या

४ . तंत्रज्ञानाच्या युगात आपली ............काहीशी बदलली आहे .

अ ) जीवनशैली

ब ) सवय

क ) परीस्थीती

ड ) आवड

५. कुमारवयीन मुला - मुलींमध्ये .............प्रभाव खूप जास्त आहे .

अ ) शिक्षकांचा

ब ) वडिलांचा

क ) नातेवाईकांचा

ड ) समवयस्कांचा

६. ................पदार्थामुळे तोंड ,फुप्फुसे यांचा कर्करोग होतो.

अ) गरम

ब) तिखट

क ) तंबाखूजन्य

ड ) अतिगोड

७ . संगणक व इंटरनेट यांच्या सतत संपर्कात राहणाऱ्या व्यक्ती ...........

होत जातात .

अ ) धीट

ब )  घाबरट

क ) एकलकोंड्या

ड ) गुन्हेगार

८ पोलिस यंत्रणेत ............ हा नव्याने सुरु करावा लागलेला विभाग आहे .

अ ) सायबर गुन्हेकक्ष

ब )  महिला संरक्षण

क ) वरिष्ट नागरिक

ड ) खुनाने तपासकार्य

९ . विद्यार्थ्यांना अध्ययनात एकाग्रता वाढविण्य साठी ................

खूप उपयोग होतो.

अ ) खाऊचा

ब )  धान्यधार्नीचा

क ) छंदाचा

ड ) खेळांचा

१० .एखाद्या पाळीव प्राण्याचे ..............या छंदामुळे विचारसरणी सकारात्मक होते.

अ ) संगोपन

ब )  पोषण

क ) वहन

ड ) दर्शन

**प्रश्न २ . वेगळा घटक ओळखा .**

१ ) परिवहन,सुविधा ,सामाजिक ,सुरक्षित ,समुपदेशन ,स्वच्छतागृह

२)  आधारकार्ड ,पॅनकार्ड ,सुबेछाकार्ड ,क्रेडीट कार्ड .

३ ) व्हॉटसअ‍ॅप, इन्स्टाग्राम, फेसबुक, पाठ्यपुस्तक.

४) तंबाखू, हास्यमंडळ, मद्यसेवन, अमली पदार्थ.

**प्रश्न ३. सहसंबंध ओळखा.**

१. तंबाखू सेवणार नियंत्रण : टाटा ट्रस्ट : : झोपडपट्टीतील मुलांना शिक्षण : ........................
२. नशा देणारे पदार्थ : आमली पदार्थ : : कर्करोगजन्य पदार्थ : .....................
३. मोबाईल मधील प्रारणे : डोकेदुखी : : ................... : मेंदूच्या वाढीला अरथडा.

**प्रश्न ४. फक्त नावे लिहा.**

१. ताणतणाव कमी करणारे छंद.

२. सामाजिक आरोग्य धोक्यात आणणारे रोग.

३. मोबाईल फोनच्या अती वापरामुळे उदभवणारे शारीरिक त्रास.

४. सायबर गुन्ह्याच्या कक्षेत येणाऱ्या कृती